विभागीय, जिल्हा व तहसील स्तरावर भ्रष्टाचार निर्मूलन समित्या व दक्षता पथकांमधील शासकीय /अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी पात्रता.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक - अहत १६१०/प्र.क्र.६४/१०/११-अ
मंत्रालय, मुंबई -४०००३२
तारीख: २० फेब्रुवारी, २०१५

वाचा -

1. **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अहत १६१०/प्र.क्र.६४/१०/११-अ, दि.४.२.२०११**
2. **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अहत १६१०/प्र.क्र.६४ /१०/११-अ, दि.१६.१.२०१५**

शासन परिपत्रक

संदर्भाधीन अ.क्र.१ येथिल शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अहत १६१०/प्र.क्र.६४/१०/११-अ, दि.४ फेब्रुवारी,२०११ अन्वये विभागीय, जिल्हा, व तहसिल स्तरावर गठित केलेल्या भ्रष्टाचार निर्मुलन समित्या व दक्षता समित्यांवरील शासकीय /अशासकीय सदस्यांसाठी सुधारीत पात्रता निकष अ.क्र.२ येथिल दि.१६.१.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित केलेले आहेत.

सर्व विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की त्यांच्या अधिपत्याखालील विभाग,जिल्हा व तालुका स्तरावरील भ्रष्टाचार निर्मुलन समित्या व जिल्हा दक्षता समित्यांवर सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या शासकीय/अशासकीय सदस्यांची पात्रता दि.१६.१.२०१५ च्या शासन परिपत्रकातील सुधारीत निकषांनुसार तपासण्यात यावी व जे सदस्य (शासकीय/अशासकीय) निकषांची पुर्तता करीत नाहीत, अशा सदस्यांना समितीवरुन वगळण्याची कार्यवाही करावी व कार्यवाहीचा अहवाल शासनास त्वरित पाठवावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२२०१७३१४७९३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2015.02.20 17:59:46 +05'30'

(डॉ.भगवान सहाय)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रत,

१) राज्यपालांचे प्रधान सचिव,

२)मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) सर्व विधानमंडळ सदस्य,
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव,
७) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ/ विधानपरिषद सचिवालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
* महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
सर्व विभागीय आयुक्त/ पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ पोलीस महानिरीक्षक व संचालक, एसीबी, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ सर्व पोलीस उप महानिरिक्षक/सर्व पोलीस आयुक्त/ सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व जिल्हाधिकारी,

त्यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील सूचना जिल्हा/तालुका स्तरावरील संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात.

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व पोलीस अधिक्षक,
सर्व अधिक्षक/ कार्यकारी अभियंता, पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभाग/ सर्व विभागीय मृद संधारण अधिकारी / सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था/ सर्व निवासी उप जिल्हाधिकारी/ सर्व तहसिलांचे प्रभारी सहायक/ उपजिल्हाधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील सूचना त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात.

मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील प्रशासकीय कार्यालये /कार्यासने,
निवडनस्ती.

* पत्राने